# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

महाकुंभमेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशातल्या प्रयागराज इथं सुरुवात झाली. आजपासून म्हणजे पौष पौर्णिमेपासून सुरु झालेला कुंभमेळा पुढचे ४५ दिवस म्हणजे महाशिवरात्रीपर्यंत सुरु राहणार आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती नदीच्या पवित्र त्रिवेणी संगमात आज पहिलं स्नान झालं. महाकुंभमेळ्याची सुरुवात झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय मुल्ये आणि संस्कृतिची जोपासना करणार्या करोडो भारतीयांसाठी हा एक विशेष दिवस असल्याचं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

दरम्यान, पंतप्रधान मोदी येत्या १९ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना आणि विचार १७ तारखेपर्यंत एक आठ शून्य शून्य एक एक सात आठ शून्य शून्य या नि:शुल्क क्रमांकावर, मायजीओव्ही ओपन फोरमवर किंवा नमो ॲप वर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. या महिन्याच्या शेवटच्या रविवारी २६ तारखेला प्रजासत्ताक दिन असल्यामुळे हा कार्यक्रम १९ तारखेला होत आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी जनतेला आज साजऱ्या होणाऱ्या लोहरी आणि उद्या साजऱ्या होणाऱ्या मकर संक्रांत, पोंगल आणि माघ बिहू या सणाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.
हे सण देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचं प्रतिक आहे, प्रत्येकाच्या जीवनात ते उत्साह आणि आनंद घेऊन येतात, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

देशाचं पोषण करण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या शेतकऱ्यांबद्दलही त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

****

नाशिक शहरात मुंबई- आग्रा महामार्गावर काल झालेल्या अपघातात सहा जण ठार तर दहा जण गंभीर जखमी झाले. काल संध्याकाळी साडेसात वाजता द्वारका परिसरातल्या उड्डाणपुलावरून जाणारा टेम्पो पुढे लोखंडी सळया घेऊन जाणाऱ्या मालट्रकवर आदळल्यामुळे हा अपघात झाला. निफाड तालुक्यातल्या धारणगावहून धार्मिक कार्यक्रमावरून नाशिकला परतणाऱ्या या टेंपोमधल्या भाविकांच्या शरीरात सळ्या घुसल्या असून, जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ठार झालेले सर्वजण नाशिक शहरातले रहिवासी होते.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. अपघातातल्या मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येईल आणि जखमींचा खर्च शासनातर्फे करण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरच्या संदेशात सांगितलं.
मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक मध्ये जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांची भेट घेऊन विचारपूस केली.

****

नागपूर इथं आजपासून तीन दिवसीय राज्यस्तरीय मराठी भाषाप्रेमी शैक्षणिक साहित्य संमेलनाचं उद्घाटन झालं. यावेळी प्रसिद्ध मराठी अभिनेते अंकुश चौधरी, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, यांच्यासह अनेक साहित्यिक, लेखक यवेळी उपस्थित होते. या संमेलनात विविध सत्रांमध्ये अनेक विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटक झालेल्या वाल्मिक कराड विरोधात मकोका अंतर्गत कारवाई करावी, या मागणीसाठी, संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी आज पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरु केलं आहे. या आंदोलनात गावकरी सहभागी झाले आहेत. या प्रकरणाला ३३ दिवस झाले तरी देखील दोषींना अजुनही शिक्षा झाली नसल्यामुळे गावकऱ्यांनी तपास यंत्रणेवर संशय व्यक्त केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेडमध्ये बावरीनगर इथं अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेला आज धम्म ध्वजारोहणाने प्रारंभ झाला. या परिषदेत आज दुपारी महात्मा ज्योतिबा फुले पुतळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत धम्मयान संचलन करण्यात येणार आहे. उद्यापर्यंत चालणाऱ्या या परिषदेत धम्म देसना, सामुहिक विवाह सोहळा, व्यसन मुक्ती प्रतिज्ञा, धम्म ज्ञान परीक्षा प्रमाणपत्र वितरण आदी कार्यक्रम होणार आहेत.

****

लातूर इथं आज विवेकानंद संस्कार संस्थेच्यावतीनं विद्यार्थी – पालक स्नेह मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला लातूर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यातले विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थी विकास योजना आणि सेवा सहयोग फाउंडेशन यांच्यावतीने गेल्या वर्षात २३ राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या ८९७ विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्यात आली, या योजनेचा लाभ मिळालेल्या विद्यार्थी आणि पालकांसाठी हा मेळावा घेण्यात आला.

****

नवी दिल्लीत आजपासून पहिल्या खो–खो विश्वचषक क्रीडा स्पर्धा रंगणार आहेत. १९ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत २३ देशांचे ३९ संघ सहभागी होत आहेत. भारताच्या पुरुष संघाचं नेतृत्व प्रतीक वायकर तर महिला संघाचं नेतृत्व बीड जिल्ह्यातली प्रियंका इंगळे करत आहे.

****